# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## राज्य सरकारकडून कर्जमाफीतील ५६ लाखांपैकी ५५३ शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या निर्णयाची अंमलबजावणी सुरु करत आहोतअसं म्हटलं. या निर्णयासाठी राज्य सरकारनं ३६५८५ कोटींची भरीव तरतूद केली आहे. यामाध्यमातून ५६ लाख कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. महात्मा फुले शेतकरी कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या १२ लाक शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे, असं सहकारमंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले. यावेळी सहकारमंत्र्यांनी विविध जिल्हा बँकांच्या ५५३ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची पहिली यादी जाहीर केली. राज्य सरकारकडून आज प्रातिनिधिक पद्धतीनं कर्जमाफीतील पात्र असलेल्या ५५३ शेतकऱ्यांच्या नावांची यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये अमरावती जिल्हा बँक ५८ शेतकरी, लातूर जिल्हा बँक १३३, नागपूर जिल्हा बँक १६, पुणे जिल्हा बँक ८५ शेतकरी, सातारा जिल्हा बँक ३८ आणि ठाणे जिल्हा बँक १८२ शेतकरी अशा ५५३ शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या शेतकऱ्यांचं २ कोटी ९९ लाख ३७ हजार ५४० रुपयांचं कर्ज माफ करण्यात आलं आहे. यादी अपलोडिंग सुरु असल्याची माहिती बाबासाहेब पाटील यांनी दिली. राज्य सरकारकडून पहिल्यांदा ५ जुलै पर्यंत यादी जाहीर करण्यात येणार होती. मात्र, २०१९ च्या कर्जमाफीच्या यादीतील शेतकऱ्यांची वाढ झाल्यानं वेळ लागतोय. शेती बाह्य उत्पादनातून इन्कम टॅक्स भरणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ द्यायचा नाही. इन्कम टॅक्सचा डेटा मिळाल्यानंतर लगेचच प्रक्रिया पूर्ण होईल, असं सहकार विभागाकडून सांगण्यात आलं.


(वर्ष ६५ वे अंक १८७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.२३ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# गेल्या १० वर्षात १५२ पेपर फुटले, तरी कोणालाही शिक्षा नाही

## राहुल गांधींचा केंद्र सरकारवर हल्लाबोल

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- गेल्या काही दिवसांपासून दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू आहे. नीट परीक्षेच्या पेपर फुटीच्या मुद्यांवरून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला जावा, या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीकडून आंदोलन करण्यात येत आहे. याच मुद्यावरून सोमवारी कॉक्रोच जनता पार्टीच्यावतीने संसदेवर मोर्चा काढण्यात आला. मात्र, यावेळी पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज करत अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. त्यामुळे मोठा गोंधळ पाहायला मिळाला. यावरून विरोधक चांगलेच आक्रमक झाले आहेत.

पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज करत अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्याच्या घटनेचे पडसाद पावसाळी अधिवेशनात देखील उमटले आहेत. यावरूनच लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षाच्या सर्व खासदारांनी पंतप्रधान मोदींच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन केलं. यानंतर आज (२२ जुलै) राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकावर जोरदार टीका केली.

शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी रास्त असल्याचं सांगत देशात गेल्या १० वर्षात तब्बल १५२ पेपर फुटले आहेत, तरी कोणालाही शिक्षा झाली नाही, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. तसेच पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केल्याच्या घटनेवरून राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी तीन मागण्या केल्या आहेत.

"सध्या देशात हे काय घडत आहे? आमच्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यासारखं एवढं विद्यार्थ्यांनी काय केलं होतं? ते शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करत होते. त्यांचा कोणत्याही गुन्ह्याशी संबंध नव्हता. सध्या देशात पेपरफुटी ही खूप मोठी समस्या निर्माण झालेली आहे. नीट पेपर फुटीच्या घटनेनंतर अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. अनेक विद्यार्थी नैराश्यात गेले आहेत. गेल्या १० वर्षांत १५२ पेपर फुटले आहेत, तरी देखील कोणालाही शिक्षा नाही", असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.



राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केंद्र सरकारकडे तीन मोठ्या मागण्या केल्या आहेत. राहुल गांधी म्हणाले की, "शिक्षणमंत्री म्हणून अपयशी ठरलेले धर्मेंद्र प्रधान यांना त्यांच्या पदावरून तात्काळ हटवा. शिक्षणमंत्र्यांना पदावरून हटवण्याची मागणी ही १०० टक्के न्याय्य आणि पूर्णपणे रास्त आहे. यात काहीही चुकीचं नाही. जी व्यवस्था सांभाळण्यास आपण असमर्थ आहोत, हे त्यांनी अवघ्या भारताला दाखवून दिलं आहे. एकापाठोपाठ एक परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटना घडत आहेत", असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

राहुल गांधी यांनी दुसरी मागणी अशी केली की, "ज्या व्यक्तीने आमच्या विद्यार्थ्यांकडे बोट दाखवलं, त्यांच्यावर लाठीचार्ज केला, त्या लाठीचार्जचे आदेश कोणी दिले होते आणि त्या व्यक्तीला त्या घटनेसाठी जबाबदार धरलंच पाहिजे", असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

राहुल गांधी यांनी तिसरी मागणी अशी केली की, "ही संपूर्ण यंत्रणा चालवणारी व्यक्ती, जी या सर्व घटनांसाठी जबाबदार आहे. त्या व्यक्तीने (मोदींनी) दिल्लीत जे काही घडलं, त्याबाबत विद्यार्थ्यांची माफी मागितलीच पाहिजे", असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

# आंदोलकांचे व्हिडिओ पाहायला वेळ नाही; पोलीस कारवाईवर तत्काळ सुनावणीस सुप्रीम कोर्टाचा नकार

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटी, शिक्षण व्यवस्थेतील कथित गैरव्यवहार आणि परीक्षेतील गैरप्रकारांप्रकरणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, यासाठी कॉक्रोच जनता पार्टीसह हजारो विद्यार्थ्यांनी संसदेवर मोर्चा नेला होता. यावेळी दिल्ली पोलिसांनी लाठीचार्ज, अश्रुधुरांचा वापर करत कारवाई केली. दिल्ली पोलिसांनी केलेल्या या कारवाईविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. परंतु, तत्काळ सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट नकार दिला.

याचिका दाखल करणाऱ्या वकिलाने सर्वोच्च न्यायालयाला दिल्ली पोलिसांच्या हल्ल्याचा व्हिडिओ पाहून या प्रकरणाची दखल घेण्याची विनंती केली



होती.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्टपणे सांगितले की, व्हिडिओ पाहण्यासाठी न्यायालयाकडे वेळ नाही. न्यायालयाचा आणि स्वतःचा वेळ वाया घालवू नये, असेही सर्वोच्च न्यायालयाने यावेळी म्हटल्याचे सांगितले जात आहे.

एका वकिलाने सर्वोच्च न्यायालयात आंदोलकांवरील पोलीस कारवाईचा मुद्दा उपस्थित करत माहिती दिली की, पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर केला होता आणि त्याचे अनेक व्हिडिओ उपलब्ध आहेत. त्यांनी न्यायाधीशांना विनंती केली की, त्यांनी स्वतः ते व्हिडिओ पाहावेत आणि या प्रकरणाची स्वतःहून दखल घ्यावी. यावर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी वकिलाला मध्येच थांबवले आणि सांगितले की, आम्हाला व्हिडिओ पाहण्यात रस नाही. आमच्याकडे व्हिडिओ पाहण्यासाठी वेळ नाही. सर्वोच्च न्यायालयाचा वेळ वाया घालवू नये, असा सल्ला सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी दिला.

दरम्यान, वकिलांनी स्पष्ट केले की, आंदोलन करणारे विद्यार्थी नीट परीक्षेचे योग्य आयोजन आणि राष्ट्रीय चाचणी संस्थेमधील सुधारणा यांसारखे महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करत आहेत. भविष्यातील अनियमितता टाळण्यासाठी परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याची त्यांची मागणी आहे.

# आधी धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, मग चर्चा-खरगे

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान बुधवारी विरोधकांनी कॉकरोच जनता पक्षाच्या समर्थकांवरील पोलीस कारवाईच्या मुद्द्यावरून गदारोळ केला. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी लोकसभेत विचारले की, पोलिसांना मुलींचे कपडे फाडण्याचा अधिकार कोणी दिला?

लोकसभेत काँग्रेस खासदार के.सी. वेणुगोपाल म्हणाले की, विरोधकांची मागणी अगदी स्पष्ट आहे की केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. त्याला उत्तर देताना संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू म्हणाले की, सरकार गेल्या तीन दिवसांपासून नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावर सातत्याने चर्चेची ऑफर देत आहे.

राहुल गांधी यांच्यासह इतर विरोधी खासदार काळे कपडे घालून संसदेत पोहोचले. विरोधी पक्ष २० जुलैच्या संसद मार्चदरम्यान विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाई, पेपरफुटी आणि धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सातत्याने आंदोलन करत आहे.

मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, 'आधी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, त्यानंतर सभागृहात या विषयावर चर्चा होईल. पंतप्रधान मोदींनी आधी यावर आश्वासन द्यावे. वास्तविक पाहता, सरकार सभागृहात नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार आहे.'

लोकसभेतील गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज गुरुवारपर्यंत तहकूब करण्यात आले आहे. राज्यसभेचे कामकाज आज दुपारी ३ वाजेपर्यंत तहकूब राहील.

# नीट पेपरफुटीवरून काँग्रेस आक्रमक; मुंबईसह नागपूर-पुण्यात आंदोलन

मुंबई/नागपूर दि.२२ (प्रतिनिधी)- दिल्लीत राहुल गांधी यांच्यावरील पोलिस कारवाईच्या निषेधार्थ मुंबईत काँग्रेसने बुधवारी भाजपच्या प्रदेश कार्यालयाबाहेर जोरदार आंदोलन केले. गांधी भवन परिसरात झालेल्या या आंदोलनात प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, नसीम खान यांच्यासह मोठ्या संख्येने काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान पोलिसांनी अनेक नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

दिल्लीतील जंतर-मंतर परिसरात सुरू असलेल्या नीट पेपरफुटी आंदोलनादरम्यान राहुल गांधी यांच्याशी झालेल्या कथित धक्काबुक्की आणि पोलिस कारवाईच्या निषेधार्थ काँग्रेसने राज्यभर आंदोलनाची हाक दिली होती. त्याचाच भाग म्हणून मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयाबाहेर हे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान हर्षवर्धन सपकाळ रस्त्यावर ठिय्या देऊन बसले. त्यांच्या एका हातात भारतीय संविधानाची प्रत तर दुसऱ्या हातात गुलाबाचे फूल होते. कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

आंदोलन अधिक आक्रमक होताच पोलिसांनी आंदोलकांना हटवण्यास सुरुवात केली. सुरुवातीला चर्चा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र कार्यकर्त्यांनी रस्ता सोडण्यास नकार दिल्यानंतर पोलिसांनी हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, नसीम खान यांच्यासह अनेक नेते आणि कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. आंदोलनादरम्यान काँग्रेस नेत्यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

आंदोलनात सहभागी असलेल्या नेत्यांनी सांगितले की, 'दिल्लीत राहुल गांधी यांच्याशी ज्या पद्धतीने वागणूक देण्यात आली, त्याचा निषेध करण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरलो आहोत. आम्ही शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आहोत. तरीही पोलिसांकडून आम्हाला ताब्यात घेतले जात आहे.' आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली. पोलिसांनी एकामागोमाग एक आंदोलकांना उचलून पोलिस वाहनांमध्ये बसवले. काही कार्यकर्त्यांनी रस्त्यावर झोपून निषेध व्यक्त केला. त्यामुळे गांधी भवन परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

राज्यातील दिग्गज काँग्रेस नेत्यांनी मुंबईतील आंदोलनात सहभाग नोंदवला. यावेळी मोदी सरकार हाय-हाय, गुंडा सरकार हाय-हाय अशा घोषणा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांवरील लाठीमारामुळे काँग्रेसने काल पासून देशभरात रान पेटवले आहे. याचाच एक भाग म्हणून आज मुंबईत काँग्रेसने आक्रमक आंदोलन केले. यावेळी विजय वडेट्टीवारांसह इतर नेत्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

नागपुरात काँग्रेस कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन (पान ४ वर)

# रावण आणि तुमच्यात फरक काय?; दिल्लीत उद्धव ठाकरेंचा मोदी-शहांवर घणाघात

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दर्शवला आहे. काल त्यांनी जंतरमंतरवर जाऊन आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतली. यानंतर आज दिल्लीत पत्रकार परिषद घेत ठाकरेंनी केंद्र सरकारवर आणि भाजप नेत्यांवर सडकून टीका केली. 'सत्तेची हवा डोक्यात गेल्याने सरकार विद्यार्थ्यांशी संवाद साधत नाही,' असा आरोप करत त्यांनी 'तुमच्यात आणि रावणात फरक काय?' असा सवाल सरकारला विचारला आहे.

पत्रकार परिषदेच्या सुरुवातीलाच उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, 'मी काल अचानक विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला समर्थन दिलेले नाही, तर पहिल्या दिवसापासून माझा या आंदोलनाला पाठिंबा आहे.' काल जंतरमंतर येथे जाऊन त्यांनी अभिजीत आणि इतर सर्व आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेतली व त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीवर जोरदार हल्लाबोल करताना ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांना लक्ष्य केले. ते म्हणाले, 'सध्या लोक म्हणू लागले आहेत की या सरकारपेक्षा इंग्रज चांगले होते. मोदी आणि शहांच्या डोक्यात सत्तेची हवा गेली आहे.' जर सरकारने या विषयावर विद्यार्थ्यांशी आधीच चर्चा केली असती, तर हे आंदोलन इतके पुढे गेले नसते, असा दावा त्यांनी केला.

# बिहारमध्येही मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर पेपरफुटीविरोधात आंदोलन; भाजप नेत्यांच्या वाहनांवर आंदोलकांचा हल्लाबोल

पाटणा दि.२२ (वृत्तसंस्था)- बिहारमध्ये मुख्यमंत्री निवासस्थानाबाहेर नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला. पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना मारहाण केली. आंदोलनादरम्यान, अनेक विद्यार्थी रस्त्यावर झोपले, ज्यांना पोलिसांनी फरफटत नेले. त्यांना वाहनांमध्ये जबरदस्तीने बसवले. यापूर्वी, पोलिसांनी डाकबंगला चौकात विद्यार्थ्यांना बॅरिकेड्स लावून अडवले होते. सुमारे एक तासभर, विद्यार्थ्यांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली आणि बॅरिकेड्सवर चढले. पोलिसांनी त्यांना पांगून जाण्यास वारंवार सांगितले, पण त्यांनी नकार दिला. विद्यार्थ्यांना हटवण्यासाठी सीआयएसएफ आणि सीआरपीएफला पाचारण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी बॅरिकेड्स तोडून राजभवनाच्या दिशेने कूच केले.

डाकबंगला चौकातून बाहेर पडणाऱ्या भाजप नेत्यांच्या वाहनांवरही आंदोलकांनी हल्ला केला. एका आमदाराला जीव वाचवण्यासाठी पळून जावे लागले. आंदोलनादरम्यान पाटणा पोलीस महानिरीक्षकांच्या सुरक्षा वाहनावर हल्ला झाला. आंदोलकांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक (एसपी) यांच्यासमोर टाळ्या वाजवल्या. यापूर्वी, पोलिसांनी विद्यार्थ्यांना जेपी गोलंबर येथे थांबवले होते, परंतु त्यांनी तेथील बॅरिकेड्स तोडून डाक बंगल्यापर्यंत मजल मारली. जेपी गोलंबर येथे विद्यार्थ्यांना थांबवण्यासाठी पोलिसांनी पाण्याचे फवारे, अश्रुधूर आणि लाठीचार्जचाही वापर केला. असे असूनही, त्यांनी रस्त्यावर बसून आंदोलन सुरूच ठेवले. विद्यार्थ्यांनी सकाळी गांधी मैदानावरून राजभवनाकडे मोर्चा काढला.

विद्यार्थिनी मनीषा म्हणाली, "आम्ही नीट पेपरफुटी, बिहारमधील एईडीओ पेपरफुटी आणि टीआरई ४ अधिसूचनेविरोधात आवाज उठवत आहोत. हे सरकार कोणाचेही ऐकत नाही. ते हुकूमशाही बनले आहे. आम्ही धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करतो." पाटणा विद्यापीठाची विद्यार्थिनी सबा आफ्रिन म्हणाली, "दिल्लीतील जंतर मंतरवर २१ दिवसांपासून काय चालले आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, एनटीए बरखास्त करावी आणि आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांप्रति थोडी सहानुभूती दाखवावी, अशी सर्वांची मागणी आहे."

# शरद पवारांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट



नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस भाजपसोबत एनडीए आघाडीत सामील होणार अशी चर्चा असतानाच बुधवारी दिल्लीत अत्यंत महत्त्वाची घडामोड घडली आहे. राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार यांनी बुधवारी सकाळी अचानक संसदेत पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली. या भेटीचे काही फोटो समोर आले आहेत. यामध्ये पंतप्रधान मोदी हे अगदी हाताला धरुन शरद पवार यांना आपल्या कक्षात आणताना आणि हसतखेळत त्यांच्याशी गप्पा मारताना दिसत आहेत. नीट (पान ४ वर)

# विद्यार्थी आंदोलनांवरून राजनाथ सिंह यांची विरोधकांवर जोरदार टीका

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनावरून दिल्लीत चांगलंच राजकीय वातावरण तापलं आहे. या सर्व घडामोडींवर आता भारतीय जनता पक्षाचे नेते तथा केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. 'काही राजकीय पक्ष तरुणांची दिशाभूल करत असल्याचा आरोप राजनाथ सिंह यांनी या विद्यार्थी आंदोलनांवरून केला आहे.

"दिल्लीत सध्या सुरू असलेलं आंदोलन हे चिंतेची गोष्ट आहे. काही लोक विद्यार्थी आणि तरुणांचा वापर स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी, राजकीय हत्यार म्हणून करण्याचा प्रयत्न करत आहेत. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली आमचं सरकार विद्यार्थी आणि तरुणांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी व त्यांचं कल्याण सुनिश्चित करण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे. आपल्या विद्यार्थ्यांच्या प्रत्येक समस्या ऐकून घेऊन त्या सोडवण्याची आमची जबाबदारी आहे. भारताची जागरूक, प्रगल्भ आणि विवेकी युवाशक्ती अशा दिशाभूल करणाऱ्या प्रयत्नांना समजते. आजची युवाशक्ती प्रगती, विकास आणि राष्ट्रनिर्मितीचा मार्गच निवडेल असा मला विश्वास आहे", असं राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे.

"कोणावरही विशेषतः विद्यार्थ्यांवर आणि तरुणांवर अन्याय होणार नाही याची खात्री करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. विरोधी पक्षातील काही नेत्यांनी निर्माण केलेली संतापाची भावना हा जनतेला आणि विशेषतः आमच्या तरुणांना गोंधळात टाकण्याचा व दिशाभूल करण्याचा एक अयशस्वी प्रयत्न आहे. आम्ही तरुणांच्या भावना आणि चिंता याबाबत संवेदनशील आहोत. संसदेचं अधिवेशन सुरू आहे आणि सरकारने प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करण्याची तयारी दर्शवलेली आहे. तरी देखील विरोधी पक्ष संसदेऐवजी रस्त्यावर उतरून प्रश्न सोडवण्याचा अयोग्य प्रयत्न करत आहे", अशा शब्दांत राजनाथ सिंह यांनी विरोधकांवर टीका केली.

# कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन करावं, शशिकांत शिंदेंचे आदेश

मुंबई दि.२२ (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटी प्रकरणावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडून कार्यकर्त्यांना रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. पक्षाचे सर्व आमदार, खासदार, प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, फ्रंट सेल अध्यक्षांनी आंदोलनात सहभागी होण्याचे शिंदे यांनी आदेश दिले आहेत.

नीट परीक्षेतील पेपर फुटीच्या पार्श्वभूमीवर, आपल्या देशाचे भविष्य असणारे विद्यार्थी अत्यंत शांततेच्या मार्गाने आपले आंदोलन करत आहेत. या नीट पेपरफुटीमुळे तब्बल २० हून अधिक निष्पाप विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. ही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक बाब आहे. अशा संवेदनशील वेळी जबाबदार राज्यकर्ते म्हणून सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घ्यायला हवी होती. मात्र, न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरलेल्या तरुणांवर पोलिसांनी ज्या क्रूर, निष्ठुर आणि अमानुषपणे लाठीहल्ला केला, तो भारतीय लोकशाहीवरील काळा डाग आहे.

भारताचे भविष्य असणाऱ्या तरुण-तरुणींना जर सरकारकडून अशी लाजिरवाणी वागणूक दिली जात असेल आणि दडपशाही करून त्यांच्या हक्कांची सर्रास पायमल्ली (पान ४ वर)

# अनंतनागमधील लाल चौकात दहशतवादी हल्ला, हेड कॉन्स्टेबलचा मृत्यू

श्रीनगर दि.२२ (वृत्तसंस्था)- काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील लाल चौक परिसरात बुधवारी दहशतवाद्यांनी हल्ला केला. यात एका हेड कॉन्स्टेबलचा मृत्यू झाला. लष्कर-ए-तैयबाशी संबंधित दहशतवादी संघटना 'द रेजिस्टेंस फ्रंट'ने या घटनेची जबाबदारी स्वीकारली आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, दुपारी सुमारे १२:३० वाजता दहशतवाद्यांनी कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवर अचानक गोळीबार केला. सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर दिले, त्यानंतर दोन्ही बाजूंनी गोळीबार झाला. यावेळी हेड कॉन्स्टेबल आशिक हुसैन जखमी झाले. रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर लष्कर आणि पोलिसांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला आहे. अतिरिक्त सुरक्षा दलांना घटनास्थळी पाठवण्यात आले आहे. ज्या ठिकाणी गोळीबार झाला, ते शहराचे मुख्य बाजारपेठ आहे. येथे सामान्य दिवसांतही बरीच गर्दी असते.

# काँग्रेसचे आंदोलन केवळ राजकीय नौटंकी! त्यांच्या सत्ताकाळात २८ वेळा पेपरफूट-बावनकुळेंचा आरोप

नागपूर दि.२२ (प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांनी आपल्या हक्कांसाठी आंदोलन करणे योग्य असले तरी त्यांच्या आंदोलनामागे राजकीय कटकारस्थान रचून त्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. एखादी घटना घडल्यानंतर त्याचे राजकारण करून समाजात वातावरण बिघडवणे अयोग्य आहे. राहुल गांधी व काँग्रेसने केलेले आंदोलन केवळ राजकीय नौटंकी असल्याचा आरोप महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. बुधवारी नागपुरात ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

पेपरफुटीच्या मुद्द्यावरून काँग्रेस आता आंदोलन करत आहे. मात्र काँग्रेसच्या सत्ताकाळात तब्बल २८ वेळा पेपरफुटीच्या घटना घडल्या होत्या. त्यामुळे या विषयावर काँग्रेसला बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. विद्यार्थ्यांना पेपरफुटीमुळे मानसिक त्रास होतो आणि ही अत्यंत गंभीर बाब आहे. सरकारने या प्रकरणात योग्य वेळी हस्तक्षेप करून दोषींचा शोध घेतला असून, कोणतीही तक्रार येण्यापूर्वीच कारवाई केली असल्याचा दावा त्यांनी केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घेतलेल्या भेटीचा नेमका विषय माहिती नाही. मात्र विरोधी पक्षातील नेते आणि पंतप्रधान यांच्यात भेटीगाठी होणे ही भारतीय लोकशाही आणि संस्कृतीचा भाग आहे. हीच महाराष्ट्राची संस्कृती आहे. या भेटीत काहीच गैर नाही असे बावनकुळे म्हणाले.

उद्धव ठाकरे आणि अरविंद केजरीवाल यांच्या भेटीबाबत बावनकुळे यांनी भाष्य केले. उद्धव ठाकरे यांनी आधी स्वतःचे खासदार आणि नगरसेवक सांभाळावेत. २०२९ च्या निवडणुकांना अजून वेळ असून सध्या विकासाच्या मुद्द्यांवर राजकारण होणे आवश्यक आहे. जे स्वतःचे लोक सांभाळू शकत नाहीत, ते इतरांना काय एकत्र आणण्याचा प्रयत्न हा प्रकार केवळ विनोद आहे. अरविंद केजरीवाल घरी गेले आणि उद्धव ठाकरेही घरी गेले आहेत, असा चिमटा त्यांनी काढला.

# परत विद्यार्थ्यांवर हात उचललात तर महाराष्ट्रात फिरु देणार नाही, भाजपचा माज उतरवून टाकू-मनोज जरांगे

नवी दिल्ली दि.२२ (वृत्तसंस्था)- जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत ही जागा सोडू नये. तुम्ही एकदा का ही जागा सोडलीत तर सरकार तुमचं आंदोलन मोडून काढेल, असा सल्ला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला. मनोज जरांगे यांनी बुधवारी दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरु असलेल्या आंदोलनस्थळी जाऊन कॉकरोच जनता पार्टीच्या अभिजीत दिपके यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मनोज जरांगे भाषणासाठी उभे राहिले तेव्हा याठिकाणी असलेले अनेक अमराठी विद्यार्थी त्यांना हिंदीत बोलण्याचा आग्रह करत होते. मात्र, अभिजीत दिपके हे मनोज जरांगे मराठीत काय बोलतात, त्याचे भाषांतर करुन विद्यार्थ्यांना सांगत होते. तरीही काही विद्यार्थी मनोज जरांगे यांना हिंदीत बोलायचा आग्रह करत होते. यावर मनोज जरांगे यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत मिश्कील टिप्पणी केली. काय वेळ आलेय, मी मराठीत बोलतोय आणि हे हिंदीत सांगायले. मला हिंदी येत नाही, तोच प्रॉब्लेम आहे. पण मी हिंदी बोललो तर तुम्ही तुमचं हिंदी विसरुन जाल, असे जरांगे यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्यावर उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. यावेळी मनोज जरांगे यांनी भाजपवर जोरदार टीका केली. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा म्हणून मी इथे आलो आहे. भाजप सरकार प्रत्येकवेळी गोरगरीब लोकांच्या लेकरांवर अन्याय करते. या पुढच्या काळात सरकारने विद्यार्थ्यांवर हात उचलला तर यांचं महाराष्ट्रातील फिरण पूर्ण बंद होणार आणि यांचा माज पूर्ण उतरवल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

# धगधगता अंगार : लोकमान्य टिळक

महान कर्मयोगी, तत्त्ववेत्ता, राष्ट्रवाद जपणारे तरीही राजकारण करणारे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक! भारताच्या गौरवशाली परंपरेला भविष्यात परंपरेला भविष्यात साकार करू पाहणाऱ्या या दृष्ट्या नेत्याचा जन्म २३ जुलै १८५६ मध्ये रत्नागिरीमधील चिखली गावात एका चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. बालवयात असतानाचा त्यांचं आईचं कृपाछत्र हरवलं. त्यातच वडिलांनी अवेळी संन्यास घेतल्याने टिळकांचं 'मन'च अनाथ झाले. मात्र, जिद्दीच्या जोरावर, कुशाग्र बुद्धिमत्तेच्या सहाय्याने अध्ययन पूर्ण केले. गणित आणि संस्कृत हे दोन्ही विषय त्यांच्या आवडीचे होते. १८७३ मध्ये पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. तिथेच त्यांनी पदवी प्राप्त केली आणि १८७८ मध्ये कायद्याचा अभ्यासही पूर्ण केला.

भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाने पुन्हा एकवार उचल खाल्ली आणि इंग्रजांविरोधात रणशिंग फुंकलं. त्याचवेळी कपाळकरंट्या देशद्रोह्यांनी इंग्रजांना साथ दिली. इंग्रजी म्हणजेच परदेशी शिक्षण व्यवस्थेने भारतीयांना विमूढ केले. हळूहळू राष्ट्रभावना आणि वीरता यामधील जोश मंद व्हायला सुरूवात झाली. इंग्रजांच्या दहशतीमुळे देश संकटात सापडला. त्याचवेळेस आपल्या मुखपत्रातून जाज्वल्य देशाभिमान चेतवणारे लेखन टिळकांनी सुरू केले. त्यातील एक परिच्छेद असा, 'हा भारतरूपी सिंह आता निद्रिस्त आहे आणि म्हणूनच तो निष्क्रिय आहे. तुमचं (इंग्रजांचं) हित यातच आहे की, तुम्ही हा देश सोडून जावं. अन्यथा हा निद्रिस्त सिंह एकदा का जागा झाला तर स्वत:चे प्राण वाचवणं तुम्हाला (इंग्रजांना) कठीण होईल!

विखुरलेल्याभारतीयांनाएकत्रआणूनत्यांच्यातील स्वाभिमानाचे स्फुल्लिंग प्रज्वलित व्हावे, या उद्देशाने टिळकांनी महाराष्ट्रात गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरू केले. त्या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने देशभक्तीपर ओजस्वी भाषणे असायची. आजही काळ बदलला असला, गणेशोत्सवाचं स्वरूप बदलं असलं तरीही 'उत्साह' मात्र तोच आहे. जनमानसातील उत्सवाचे स्थान अढळ आहे. त्यावेळी कीर्तनाच्या माध्यमातून ईश्वरभक्तीबरोबरच मातृभूमीला स्वतंत्र करण्याची भावना निर्माण व्हावी म्हणून टिळकांनी कीर्तनकार तयार केले. याशिवाय बलसंपन्नतेसाठी लाठी, शस्त्रास्त्रांचे शिक्षणही व्यायामाबरोबर टिळकांनी सुरू केले. त्यासाठी ठिकठिकाणी व्यायामशाळांची स्थापना केली.


महाराष्ट्रात १८६६ च्या भीषण दुष्काळात तेरावा महिना म्हणून इंग्रजांचे अत्याचार, जबरदस्तीची करवसुली वाढतच राहिली. इंग्रजांच्या अत्याचारांच्या वस्तुनिष्ठ बातम्या मराठा आणि केसरीतून प्रकाशित होऊ लागल्याने वाचकांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. दुष्काळग्रस्तांसाठी असलेल्या मदतीसंदर्भातील पत्रके मराठीतून प्रकाशित करून दुष्काळी भागात पाठविली. याच पत्रकातून शेतकऱ्यांवर आलेल्या दुष्काळाचा सामना करण्याबरोबरच टिळकांनी इंग्रजांविरूद्ध संघर्षाचे स्फुल्लिंग चेतविले. टिळकांचा एक पाय छापखान्यात तर दुसरा पाय असहयोग आंदोलनाच्या नेतृत्वासाठी होता. त्यामुळे टिळकांची प्रतिमा उग्र संघटनेचा नेता अशी निर्माण झाली. १९०७ पर्यंत केसरीचा खप वीस हजार होता. केसरीबरोबरच न्यू इंग्लिश स्थापनेनंतर टिळकांनी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभावना निर्माणाचे अव्दितीय काम केले. १८६७ मध्ये आलेल्या प्लेग साथीच्या वेळी कमिशनर रँडच्या अमानुष अत्याचारांना केसरीतून वाचा फोडली. कडाडून विरोध केला. काँग्रेसला जनसामान्यांचा पक्ष करण्याच्या बाजूने टिळक होते. त्यासाठी त्यांनी स्वत: पुढाकार घेतला.

युवकांमध्ये त्यांची लोकप्रियता वाढली. १९०० साली दिल्लीत झालेल्या काँग्रेस अधिवेशनाला उपस्थित राहून टिळक नागपूरमध्ये आल्यावर त्यांना 'लोकमान्य' ही पदवी बहाल करण्यात आली. परदेशी वस्तूंवर बहिष्कार, स्वदेशीचा प्रयोग, वंगभंग आंदोलनाचे नेतृत्व टिळकांनी केले. १९०६ मध्ये भारतभ्रमण केले. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळविणारच!' या मंत्रानं भारतीयांना झपाटून टाकलं. २४ जून १९०८ मध्ये सरकारविरोधी लेखन केल्यावरून टिळकांवर ब्रिटीशांनी पुन्हा राजद्रोहाचा खटला दाखल केला. त्या खटल्यात टिळकांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. ही शिक्षा भोगत असतानाच टिळकांनी गीता रहस्य लिहिले. १६ जून १९१४ मध्ये त्यांची सुटका झाली.

दोनच वर्षात बेळगावमध्ये 'होमरूल' लीगची स्थापना झाली. १९०१ मधील ताई महाराज प्रकरणात फसल्यापासून १९२० पर्यंत टिळकांनी देशासाठी अखंड संघर्ष केला. शेवटच्या काळात त्यांची प्रकृती नाजूक झाली. मुंबई दौऱ्यावर असतानाच १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा देहांत झाला. टिळक युग संपले! मात्र त्यांनी निद्रिस्त हिंदू मृगेंद्राला जागे करण्याचे काम केले. या नरकेसरीचे भारतावर मोठे उपकार आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादनच!

# महान क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद

**भारताच्या** स्वतंत्र संग्रामामध्ये अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले.यामध्ये प्रामुख्याने क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नाव मोठ्या अभिमानाने आजही घेतले जाते.त्याचप्रमाणे अल्पवयात देशासाठी लढा उभारणारे महान क्रांतिकारक म्हणून चंद्रशेखर आझाद यांची ख्याती आहे. चंद्रशेखर आझाद यांचा जन्म २३ जुलै १९०६ ला मध्यप्रदेशातील झाबुआ(अलिराजपूर)जिल्ह्यातील भावरा या गावी झाला.जन्मताच त्यांच्या हृदयात क्रांतिची जोत लखलखत होती.त्यांचे प्राथमिक शिक्षण भावरा या गावात झाले.परंतु आईच्या इच्छेनुसार ते वाराणसी येथील संस्कृत पाठशाळेत शिकत असताना सुद्धा त्यांच्यात क्रांतीची ज्वाला धकधकत होती.चंद्रशेखर आझाद यांचे बालपण भिल्ल जमातीच्या वस्तीत गेले त्यामुळे ते धनुष्य बाण उत्तम रीतीने चालवत म्हणजेच त्यांच्यात बालपणापासून लढवय्य व क्रांतिकारक वृत्ती होती. १३ एप्रिल १९१९ रोजी झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांड घटनेचा चंद्रशेखर आझाद यांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला.त्यानंतर चंद्रशेखर आझाद १९२० मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील असहकार चळवळीचा एक भाग बनले आणि वयाच्या १५ व्या वर्षी त्यांना अटकही झाली.अशा परिस्थितीत ब्रिटन न्यायालयाने या छोट्याशा मुलाला १२ फटक्यांची अमानुष शिक्षा दिली.चंद्रशेखर आझाद यांचे मुळ नाव चंद्रशेखर सीताराम तिवारी होते.परंतु बालवयातील अमानुष शिक्षा पहाता ब्रिटिश न्यायालयात नाव नोंदविताना आपले आडनाव आझाद असल्याचे नोंदविले. तेव्हापासुन संपूर्ण हिंदुस्थानात चंद्रशेखर आझाद नावाने ओळखले जाऊ लागले.फटक्यांनी आझादांच्या मनात क्षोभ वाढुन तळपायाची आग मस्तकात गेली आणि त्याच क्षणी त्यांचा अहिंसेवरील विश्वास



उडाला व क्रांतीची ज्वाला प्रगट झाली आणि क्रांतिकारक झाले. आझाद यांचा क्रांतीकारी हेतू पहाता १९२२ साली महात्मा गांधीनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले. त्याचे आझाद यांना खुप वाईट वाटले. अशा परिस्थितीत त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वातंत्र्य करण्याची शपथ घेतली.पुढे त्यांची भेट हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली व क्रांतीची ज्योत आणखी प्रज्वलित झाली.क्रांतीची ज्वाला संपूर्ण भारतात पसरविण्याच्या दृष्टीने मातृभूमीच्या रक्षणार्थ अनेकांना आंदोलनात सहभागी होण्यास प्रेरित केले.इंग्रजांना आर्थिक दृष्ट्या कमजोर करण्याच्या हेतूने व क्रांतिकारकांची भिती इंग्रजांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने आझाद यांनी आपल्या बळावर काकोरी ट्रेन लुटली आणि व्हाइसरॉयच्या ट्रेनला उडविण्याचा देखील प्रयत्न केला.इंग्रजांच्या असेम्ब्लीत बॉम्ब फोडण्याच्या घटनेत चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांना पुरेपूर मदत केली.चंद्रशेखर आझाद हे भगतसिंग यांचे मुख्य सल्लागार होते.भगतसिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आझाद यांनी भरपूर प्रयत्न केलेत. अशा परिस्थितीत इंग्रजांना नेहमी प्रमाणे चकमा देतच होते. दिनांक २७ फेब्रुवारी १९३१ रोजी अलाहाबाद मधील अल्फ्रेड पार्क येथे राजगुरू हे जेलमध्ये असतांना त्यांच्या आईला आर्थिक मदत व्हावी यासाठी ते एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी गेले असता, एका अज्ञात खबऱ्याने इंग्रजांना चंद्रशेखर आझाद असल्याची वार्ता दिली आणि मोठा घात झाला.इंग्रजांना वार्ता मिळताच मैदानाला वेढा घातला. अशा परिस्थितीत चंद्रशेखर आझाद व इंग्रज सैन्य यांच्यात मोठा गोळीबार झाला.अशावेळी आझाद यांनी तीन इंग्रजांना धाराशाही केले. आपल्या जवळच्या गोळ्या संपत आहे हे त्यांच्या लक्षात आले. अशा परिस्थितीत त्यांना इंग्रजांच्या हातुन मरने पसंत नव्हते शेवटच्या गोळीने स्वतःला मारून घेतले आणि क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी शहीद झाले.भारत स्वतंत्र होण्यासाठी ज्यांनी कशाचीही पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली अशांमध्ये आघाडीवर घेतले जाणारे नाव म्हणजे क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व देश स्वतंत्र झाला. त्यामुळे त्यांच्या बलिदानाची पावती आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी देणे गरजेचे आहे. देशातील राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की देश स्वतंत्र करण्यासाठी क्रांतिकारकांनी घरदार सोडून, घरांवर तुळशीपत्र ठेवून,आपला परिवार सोडून आणि आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली.त्यांची पुर्तता करण्याचे काम आज राजकीय पुढाऱ्यांचे आहे.कारण देशातील जनता सुखी- समृध्दी आणि समाधानी रहावी म्हणून देश स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी लढा उभारला होता. आता देश स्वतंत्र झाला आहे तरी देशात बेरोजगारी, भुकमरी,महागडे शिक्षण, भ्रष्टाचार,रोजगार या सर्वांचा सामना गरीब व सर्वसामान्यांना करावा लागतो आहे.आज १४० करोड लोकसंख्येच्या देशात करोडोंची संपत्ती आहे यात दुमत नाही. परंतु मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी (आजी-माजी आमदार - खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी) देशांच्या करोडोंच्या संपत्तीवर आपली पकड मजबूत ठेवली आहे.यामुळे हा पैसा १४० कोटी जनतेपर्यंत पोहचत नाही.यामुळे आर्थिक उलाढाल खोळंबत आहे व यातुनच देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होतांना दिसतात व याचा फटका सरळ सर्वसामान्य, शेतकरी व गरीब लोकांना भोगावा लागत आहे.त्यामुळे दिवसेंदिवस गरीब हा गरीब होत आहे तर श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांना माझी विनंती आहे की क्रांतिकारकांनी आपले बलिदान दिले,आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले त्याचा फायदा शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना व्हावा या उद्देशाने कार्य केले पाहिजे. त्याचबरोबर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करून देशाच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे.तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांकडुन क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.त्याचप्रमाणे देशात वाढते प्रदुषण पहाता क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवेत.यामुळे संपूर्ण देशात वातावरण प्रफुल्लित राहील व ऑक्सिजनची मात्रा वाढेल आणि मुख्यत्वेकरून या दिवशी केलेले वृक्षारोपण अनंत काळापर्यंत आपल्याला ग्यात राहिल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व मुळांमध्ये आपल्याला क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांची क्रांतीची ज्वाला धकधकतांना दिसेल. क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना कोटी-कोटी प्रणाम. जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**

# चर्चा न करता विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज,बळाचा वापर करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करणे ही लोकशाहीला काळीमा फासणारी घटना!

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारने विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज,अश्रृधुळाचा व बळाचा वापर करून शांततापूर्ण विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला गालबोट लावून घृणास्पद कार्य केले,ही लोकशाहीला कलंकित करणारी घटना म्हणावी लागेल.भारतात लोकशाही आहे व देश संविधानाने चालतो देशाचा लोकप्रतिनिधी म्हणजे सर्वेसर्वा नसून लोकांनी निवडून दिलेला प्रतिनिधि असतो.ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.देश स्वतंत्र करण्यासाठी लाखों शहिदांसह अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली तेव्हा देश स्वतंत्र झाला.त्याच्या बलिदानाची पावती म्हणजे देशातील प्रत्येक नागरिकांना, शेतकऱ्यांना, बेरोजगारांना,विद्यार्थ्यांना न्याय देणे व देश सुरक्षित चालविने ही सरकारची प्रथम जबाबदारी असते. परंतु सरकारने नीट पेपर लिक करून महापाप केले आहे.कारण यातून लाखो डॉक्टर घडतात आणि त्याच ठिकाणी सरकारने घाला घातला व आरोग्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.याच अनुषंगाने दिनांक २० जून २०२६ पासून दिल्लीतील जंतरमंतर येथे सीजेपीच्या आंदोलनाला सुरुवात झाली.यानंतर नीट पेपर लिक प्रकरणात सरकारकडुन कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळत नसल्याचे पाहून शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरणवादी श्री सोनम वांगचुक यांच्या लक्षात आले व त्यांनी दिनांक २८ जून २०२६ ला आमरण उपोषणाचा निर्धार केला.दिनांक २० जून ते १९ जुलै या ३० दिवसांच्या कालावधीत सरकारने उपोषण करत्यांसोबत कोणतीही चर्चा केली नाही,जर सरकारने चर्चा केली असती तर सरकार कडून दिनांक २० जुलै २०२६ हा लोकशाहीला कलंकित करणारा दिवस दिसला नसता व लाठीचार्ज, अश्रृधुळाचा किंवा बळाचा वापर करण्याची गरज भासली नसती.परंतु सरकारने कोणत्याही चर्चेला महत्त्व दिले नाही व चर्चेचे संपूर्ण मार्ग सरकारने बंद करून ठेवले होते आणि आता अधिवेशन काळात विद्यार्थ्यांचे आंदोलन अंगलट येणार हे पाहून व आंदोलनाची तीव्रता पाहून दिनांक २० जुलैला लाठीचार्ज,अश्रृधुळाचा व बळाचा वापर करण्यात आला.याला दोष पोलिस विभागाचा नसून स्वतः केंद्र सरकारचा आहे. कारण सरकारजवळ चर्चेसाठी भरपूर वेळ किंवा कालावधी उपलब्ध होता. परंतु पेपर फुटीचे पाप लपविण्यासाठी व यातील खुंखार गुन्हेगारांना वाचविण्यासाठी आणि पेपर फुटीचे खापर सरकारच्या डोक्यावर फुटु नये यासाठी सरकार चर्चा करण्यास तयार नसल्याचे स्पष्ट दिसून आले.त्यामुळेच २० जुलैला सरकारने बळाचा वापर करून आंदोलन मोडण्याचा प्रयत्न केला.सरकार म्हणते की, आंदोलन स्थळी विद्यार्थी कमी व असामाजिक तत्वाचे लोक जास्त होते त्यामुळे बळाचा वापर करण्यात आला व सरकार कडून सांगितले जाते की,या आंदोलनादरम्यान ५ आयपीएस अधिकारी सोबत ११८ पोलिस कर्मचारी आणि ६० पेक्षा जास्त आंदोलनकारी जखमी झाले व ७० लोकांना अरेस्ट करण्यात आले अशी माहिती सरकारी सुत्रांनी सांगितले आहे.सरकार आंदोलन कर्त्या विद्यार्थ्यांनपासुन बचावासाठी असामाजिक तत्वाचा वापर करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते.सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे देशातील विद्यार्थी वर्ग नाराज असल्याचे दिसून येते.कारण नीट पेपर लिक प्रकरणातील गुन्हेगारांना कठोर शिक्षा देण्याचे सोडुन सरकार विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करते हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.सरकारने जनूकाय शिक्षणाचा तमाशा मांडला की काय असे चित्र देशात दिसून येते. नीट पेपर लिक प्रकरणांमध्ये महाराष्ट्रातूनच सुरूवात झाली आणि नीट पेपर लिक प्रकरणातील अनेक दिग्गज महाराष्ट्रातुन पकडल्या गेले यात पुण्यातील जीवशास्त्राची वरिष्ठ प्राध्यापिका मनीषा गुरूनाथ मांढरे,प्रा.पी.व्ही.कुलकर्णी, मनीषा वाघमारे, आणि'बोगस डॉक्टर घडवणाऱ्या फॅक्टरीचा'अर्थात आयसीसीचा संचालक शिवराज मोटेगावकर यांनी शिक्षण क्षेत्राला काळीमा फासून देशाला बदनाम करण्याचे काम केले.यांना सरकारने लाठ्यांचे फटके मारायचे सोडून विद्यार्थ्यांवर बळाचा वापर केला ही तर शिक्षणप्रणालीवर घणाघाती प्रहार असून घोर पाप सरकारने केले आहे.यानंतर दिनांक २८ जूनला २०२६ ला होणाऱ्या महाराष्ट्र शिक्षण पात्रता परीक्षेची (महाटीईटी) प्रश्नपत्रिका फुटल्याचा प्रकार समोर आला आणि परिक्षा रद्द करण्यात आली अशाप्रकारे देशात अनेक पेपर फुटीचे प्रकार समोर आले असुन सुद्धा सरकार डोळे बंद करून तमाशा पहात आहे हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.यावरून स्पष्ट होते की, देशात बोगस शिक्षण प्रणालीला चालना देणारे मोठ-मोठे मासे(राजकीय पुढारी) देशात घर करून बसले आहेत व शिक्षण प्रणालीला खोकला करण्याचे काम करीत आहे. राजकीय पुढारी,आमदार-खासदार,मंत्री, वरीष्ठ अधिकारी आपल्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी पाठवितात आणि आपल्याच देशातील विद्यार्थ्यांना न्याय न देता त्यांच्यावर बळाचा वापर करतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. हा सर्व प्रकार देशातील शिक्षण प्रणालीला कलंकित करणारा आहे अशां कलंकित लोकांना फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे. कारण शिक्षणापासून लहानाचा मोठा होतो. देश घडतो आणि त्यावर सरकार एकही शब्द बोलायला तयार नाही किंवा दोषींवर कठोर कारवाई करण्यास तयार नाही ही सरकारची कोणती जबाबदारी आणि देशभक्ती म्हणावी! आजही भारत भ्रष्टाचाराच्या बाबतीत अव्वल आहे आणि ही बाब जगजाहीर आहे.आजही करोडो रूपयांचे घोटाळे करून अनेक दिग्गज विदेशात पैसा घेऊन गेले व तिथेच स्थायी झाले परंतु आपण काहीही करू शकलो नाही ही शोकांतिका आहे.आज अशोक खरात यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत व यांच्या आरोपांची ईडीने तब्बल तीन हजार पानांचे आरोपपत्र तयार केले आहे. तरीही खरातचे काहीही होणार नाही कारण आपली सिस्टीमच त्या पध्दतीची बनविली आहे.कारण अशोक खरात व रूपाली चाकणकर प्रकरण महाराष्ट्रासह संपूर्ण देशभर गाजले तरीही या प्रकरणातील प्रमुख मासे मोकाट आहेत. देश कुठे चालला हे कळायला मार्ग नाही.कारण आज राजकीय पुढारी सत्तेसाठी आणि आपल्या वर्चस्वासाठी आमदार-खासदार फोडाफोडीचे राजकारण सुरू झाले आहे.यात आमदार-खासदार आपल्या पक्षाचे आचार-विचार,पक्षाची निष्ठा,मतदारांच्या भावना ह्या संपूर्ण बाजूला सारून सत्तेकडे धाव घेतात आणि सत्ताधाऱ्यांना त्यांचे विचार सुद्धा पटायला लागले आहेत.ज्या आमदार-खासदारांना पक्ष सोडायचा आहे त्यांनी खुशाल सोडावा यात कोणाचाही विरोध नाहीच.परंतु सर्वप्रथम आमदारकी किंवा खासदारकीचा राजीनामा देऊन पक्ष सोडायला पाहिजे.परंतु सत्ताधारी पक्ष तसे न करता सरळ पक्षात घेतात किंवा वेगळा गट करून आपलेसे करून घेतात हा तर लोकशाहीवर घणाघाती प्रहारच म्हणावा लागेल.देशाच्या करोडो लोकांचे आस्थेचे ठिकाण अयोध्येतील राममंदिर आहे. येथील दान चोरीचा मामला करोडों रूपयांचा आहे यात अनेक दिग्गज सहभागी आहेत.परंतु यात दिग्गज लोकांना या आरोपातून मुक्त करून तेथील काही कर्मचाऱ्यांना दोषी ठरविण्यात आले आहे आणि राज्य सरकारने व केंद्र सरकारने आपली पाठ थोपटून घेतली आहे. म्हणजे सरकारने आता 'हम करे सो कायदा' हा पवित्रा अवलंबल्याचे दिसून येते.देशात अनेक गंभीर व जटील समस्या आहेत यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या,ओला दुष्काळ,सुखा दुष्काळ, आरोग्य सुविधा, शिक्षण, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण प्रत्येक सरकारी विभागात भ्रष्टाचार,वाढत्या महागाईचा डोंगर अशा भयावह समस्या देशापुढे व देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे उभ्या येवून ठाकल्या आहेत.परंतु सरकार या जटील समस्यांकडे लक्ष न देता सत्ताधारी राजकीय पुढारी सत्तेच्या मोहात मग्न असल्याचे दिसून येते.त्यामुळे मी विनंती करतो की,महामहीम राष्ट्रपती, सुप्रीम कोर्ट यांनी या संपूर्ण बाबींवर लक्ष केंद्रित करून देशाच्या १४५ कोटीं जनतेला न्याय द्यावा ही विनंती.जय हिंद.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# नौदलाच्या ताफ्यात आता स्वदेशी पाणबुडीविरोधी युद्धनौका 'मालवण' दाखल

नवी दिल्ली, दि. २२ (वृत्तसंस्था) - भारतीय नौदलाच्या सामर्थ्यात आणखी एक महत्त्वाची भर पडली असून स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित 'आयएनएस मालवण' ही अत्याधुनिक पाणबुडीविरोधी युद्धनौका अधिकृतपणे नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली आहे. कर्नाटकातील कारवार नौदल तळावर झालेल्या समारंभात या युद्धनौकेचे कमिशनिंग करण्यात आले. 'आत्मनिर्भर भारत' अभियानांतर्गत तयार झालेली ही माहे श्रेणीतील दुसरी युद्धनौका असून भारतीय सागरी सुरक्षेला नवी धार मिळणार आहे.

कोचीन शिपयार्ड लिमिटेडमध्ये ८० टक्क्यांहून अधिक स्वदेशी सामग्रीचा वापर करून तयार करण्यात आलेली आयएनएस मालवण भारताच्या स्वदेशी युद्धनौका निर्मिती क्षमतेचे प्रभावी उदाहरण मानली जात आहे. या युद्धनौकेमुळे विशेषतः किनारी आणि उथळ सागरी भागांमध्ये भारतीय नौदलाची पाणबुडीविरोधी कारवाई अधिक प्रभावी होणार आहे.

**उथळ समुद्रात शत्रूंसाठी मोठे आव्हान :**

आयएनएस मालवण ही युद्धनौका शत्रूच्या पाणबुड्या, अंडरवॉटर ड्रोन आणि सागरी घुसखोरांचा शोध घेऊन त्यांच्यावर अचूक कारवाई करण्यासाठी विशेष डिझाइन करण्यात आली आहे. यामध्ये अत्याधुनिक सोनार प्रणाली, लाइटवेट टॉर्पेडो आणि पाणबुडीविरोधी रॉकेट लाँचर बसविण्यात आले आहेत. सुमारे ८० मीटर लांबी आणि १,१०० टन विस्थापन क्षमता असलेली ही युद्धनौका अत्याधुनिक वॉटर-जेट प्रोपल्शन प्रणालीने सुसज्ज आहे. त्यामुळे उथळ पाण्यातही ती सहज हालचाल करू शकते आणि ताशी सुमारे ४६ किलोमीटर (२५ नॉट्स) इतका वेग गाठू शकते.

**'मालवण' नावामागे मराठी अभिमान :** या युद्धनौकेला महाराष्ट्रातील ऐतिहासिक किनारी शहर 'मालवण'चे नाव देण्यात आले आहे. तिच्या प्रतीकचिन्हात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेले 'वाघनख' समाविष्ट करण्यात आले आहे. हे प्रतीक धैर्य, चपळता आणि अचूक हल्ल्याचे प्रतिनिधित्व करते.

**समुद्रातील 'सायलेंट किलर' :** उच्च दर्जाचे स्वदेशी तंत्रज्ञान, आधुनिक शस्त्रसज्जता आणि अचूक पाणबुडीविरोधी क्षमता यामुळे आयएनएस मालवणला समुद्रातील 'सायलेंट किलर' असेही संबोधले जात आहे. शत्रूच्या हालचालींचा गुप्तपणे मागोवा घेऊन आवश्यकतेनुसार अचूक हल्ला करण्याची क्षमता या युद्धनौकेत आहे.

**वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांची उपस्थिती :** कमिशनिंग सोहळ्यास हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी पश्चिमी नौदल कमांडचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल संजय वात्सायन, कोचीन शिपयार्ड लिमिटेडचे प्रतिनिधी, नौदलातील वरिष्ठ अधिकारी, माजी सैनिक आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

**सागरी सुरक्षेसाठी बहुराष्ट्रीय सरावही सुरू :** दरम्यान, भारतीय नौदल २० ते २३ जुलैदरम्यान कोची येथे 'ऑपरेशन सदर्न रेडीनेस २६-२' या बहुराष्ट्रीय सागरी सुरक्षा प्रशिक्षण सरावाचे आयोजन करत आहे. ४० हून अधिक देशांच्या संयुक्त सागरी दलाच्या सहकार्याने होणाऱ्या या सरावातून सागरी सुरक्षा, प्रशिक्षण आणि समन्वय अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे.


# १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी मोफत एच.पी.व्ही. लसीकरण मोहीम

## ८ सप्टेंबर २०२६ पर्यंत मोहीम सुरू राहणार

छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (प्रतिनिधी) – गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देणारी एच.पी.व्ही. लस आता शहरातील १४ वर्षे पूर्ण झालेल्या व १५ वर्षे वयोगटातील सर्व पात्र मुलींना मोफत दिली जात आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत ही मोहीम प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.

राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ८ मार्च २०२६ पासून सुरू झालेली ही मोहीम आता ८ सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. मा. आयुक्त अमोल येडगे व अतिरिक्त आयुक्त-२ कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली १८ मार्च २०२६ रोजी या मोहिमेचे औपचारिक उद्घाटन झाले असून, मनपाच्या आरोग्य केंद्रांद्वारे लसीकरण सुरू आहे.

या लसीकरण मोहीम करिता पात्र वयोगट: १४ वर्षे पूर्ण झालेल्या ते १५ वर्षे वयोगटातील मुली असून छत्रपती संभाजीनगर मनपा क्षेत्रातील एकूण १२,९६१ पात्र मुलींना लस देण्याचे १००% उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.लसीकरणाची वेळ सार्वजनिक सुट्टी वगळून सकाळी ९:०० ते दुपारी २:०० वाजेपर्यंत लसीकरण मोहीम सुरू राहणार आहे. या करिता उपलब्ध ठिकाणे पुढील प्रमाणे – मनपाची सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व रुग्णालये, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), एम.जी.एम. रुग्णालय लसीकरण केंद्र, शाळांमध्ये जनजागृती व समुपदेशन, मोहिमेचा १००% टप्पा गाठण्यासाठी शाळांमध्ये पालक-शिक्षक बैठकांचे (PTM) आयोजन केले जात आहे. या बैठकांमध्ये आरोग्य अधिकारी, बालरोगतज्ज्ञ आणि स्त्रीरोगतज्ज्ञ पालकांना एच.पी.व्ही. लसीकरणाची सविस्तर माहिती देत आहेत. ही लस अत्यंत सुरक्षित व प्रभावी असून,




पालकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी विशेष समुपदेशन केले जात आहे.

'एच.पी.व्ही. लस ही मुलींचे गर्भाशयाच्या कर्करोगापासून रक्षण करण्यासाठी पूर्णपणे सुरक्षित आणि प्रभावी आहे. १००% उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पालकांनी पुढे येऊन आपल्या पात्र मुलींचे लसीकरण करून घ्यावे.' असे डॉ. उज्वला भामरे (वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी कळिवले आहे. तसेच पालकांनी सार्वजनिक सुट्ट्या वगळून जवळच्या मनपा आरोग्य केंद्रात किंवा शासकीय रुग्णालयात सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत भेट देऊन आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे असे आरोग्य विभागाचे वतीने आवाहन करण्यात येत आहे.

# माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंती निमित्त अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (प्रतिनिधी) – महानगरपालिकेच्या वतीने आज मनपा मुख्यालय येथे माजी उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंती निम्मित अभिवादन करण्यात आले. मा. महापौर समीर राजुरकर यांच्या हस्ते अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विरोधी पक्ष नेते समीर साजिद ,आयुक्त अमोल येडगे,शहर अभियंता संजय कोंबडे,मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे,उप आयुक्त अंकुश पांढरे,मुख्य उद्यान अधिक्षक डॉ. विजय पाटील,सहायक आयुक्त अनिल बोंडे,संजय सुरडकर माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद आदींची उपस्थिती होती.

# माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. २२ (प्रतिनिधी) – दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज अभिवादन करण्यात आले. अजित पवार यांच्या प्रतिमेस उपजिल्हाधिकारी (सामान्य शाखा) श्रीमती संगिता राठोड यांच्या हस्ते प्रतिमेस माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सविता चौधर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# दिव्यांग सक्षमीकरण राष्ट्रीय पुरस्कार; ऑनलाईन अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर, दि.२२(प्रतिनिधी)- सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयांतर्गत दिव्यांगजन सक्षमीकरण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. त्यासाठी पात्र दिव्यांग व्यक्ती, संस्था, संघटना इ. कडून दि.३१ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज म ागविण्यात आले आहेत,असे सहायक आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय बाबासाहेब अरवत यांनी कळिवले आहे.

इच्छुकांना आपले अर्ज राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल .ुरीवी.सीं.ळप या पोर्टलवर ऑनलाईन सादर करता येतील. अर्जासोबत दिलेल्या नमुन्यात सर्व माहिती अचूक भरावी. आवश्यक व सहाय्यक कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करावी. सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन, श्रेष्ठ दिव्यांगजन आणि श्रेष्ठ सृजनशील दिव्यांग बालक/बालिका या उपश्रेणीतील अर्जांसाठी दिव्यांगत्व प्रमाणपत्र (युडीआयडी कार्ड) अपलोड करणे अनिवार्य आहे. पुरस्कारांची पात्रता ,निकष, अर्ज प्रक्रिया व अन्य मार्गदर्शक तत्वांची सविस्तर माहिती www. depwd.gov.in आणि www.awards. gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. इच्छुकांनी दि.३१ जुलैपर्यंत आपले अर्ज पोर्टलवर सादर करावे,असे आवाहन सहायक आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

# नागरी सहकारी बँकांचे प्रगती पुस्तक

**रिझर्व** बँक ऑफ इंडिया दरवर्षी जून महिन्यामध्ये फायनान्शिअल स्टॅबिलिटी रिपोर्ट प्रसिद्ध करीत असते. अन्य आर्थिक बाबींसोबत बँकिंग मधील महत्त्वाची आकडेवारी, तुलनात्मक चार्ट, मागील वर्षांशी तुलना, आणि स्टॅंडर्ड शी तुलना असे या रिपोर्टचे सर्वसाधारण स्वरूप असते.

या रिपोर्टमध्ये शेड्युल्ड व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, बँकेतर वित्त कंपन्या (छइऋउ ) या सर्वांच्या कामगिरीवर भाष्य केलेले असते. रिझर्व बँकेला अपेक्षित काय आहे आणि प्रत्यक्षात काय झाले आहे याबाबतची आकडेवारी, चार्टस आणि ग्राफ्स या रिपोर्ट मध्ये समाविष्ट असतात. बँकिंग व्यवसाया पुरता विचार केल्यास बँकिंग व्यवसायाचे हे प्रगती पुस्तक आहे असे समजण्यास हरकत नाही. या रिपोर्ट म धील नागरी सहकारी बँकाच्या संदर्भातील आकडेवारी, भाष्य,याचा धावता आढावा पुढीलप्रमाणे आहे.

**नागरी सहकारी बँकांची कामगिरी** – १) कर्ज व्यवहार – मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी नागरी सहकारी बँकांच्या कर्ज व्यवहारात ९.६% इतकी वाढ नोंदविण्यात आली आहे. यापैकी शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांची वाढ ९.७% इतकी असून नॉन शेड्यूल्ड नागरी सहकारी बँकांची वाढ ९.५% इतकी आहे.

**२) ग्रॉस आणि नेट एनपीए** – सर्व नागरी सहकारी बँकांचा ग्रॉस एनपीए ५.२% इतका असून नेट एनपीए १% आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ही आकडेवारी प्रगतीपथावर आहे. मागील वर्षापेक्षा ग्रॉस आणि नेट एनपीए कमी झालेला आहे.

यामध्ये शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा ग्रॉस एनपीए ४% असून नेट एनपीए ०.८ इतका आहे. नॉन शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा ग्रॉस एनपीए ६.३% असून नेट एनपीए १.१% इतका आहे.

**३) नेट इंटरेस्ट मार्जिन** – नागरी सहकारी बँकांचे नेट इंटरेस्ट मार्जिन ३.३% असून मागील वर्षाच्या तुलनेत या आकड्यात किंचित वाढ झाली आहे.

यापैकी शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा नेट इंटरेस्ट मार्जिन तीन टक्के असून नॉन शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा नेट इंटरेस्ट मार्जिन साडेतीन टक्के आहे.

लाभक्षमतेसाठी ३% च्या पुढे नेट इंटरेस्ट मार्जिन असावा असा बँकिंगचा सर्वसाधारण नियम आहे.

**४) रिटर्न ऑन इन्वेस्टमेंट**

सर्व नागरी सहकारी बँकांचा रिटर्न ऑन इन्वेस्टमेंट ६.३% इतका आहे. या टक्केवारीत मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा रिटर्न ऑन इन्व्हेस्टमेंट ६.७% असून नॉन शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांसाठी ही टक्केवारी ६% इतकी आहे. दोन्ही गटात मागील वर्षापेक्षा या टक्केवारीत घट आहे.

**५) पर्याप्त भांडवल** – सर्व नागरी सहकारी बँकांचे पर्याप्त भांडवलाचा आकडा १७.७% इतका आहे. हा आकडा मागील वर्षीच्या आकड्याशी मिळता जुळता आहे. यापैकी शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा पर्यंत भांडवलाचा आकडा १६.६% असून नॉन शेड्युल नागरी सहकारी बँकांचा आकडा १८.७% इतका आहे.

नागरी सहकारी बँकांसाठी पर्याप्त भांडवलाची अट नऊ टक्के आहे तर अनेक सोयी मिळवण्यासाठी ११% ची आहे. या पार्श्वभूमीवर नागरी सहकारी बँकांचा भांडवली पाया मजबूत असल्याचे दिसून येते.

**६) प्रोव्हिजनिंग कव्हरेज रेशो –**

नागरी सहकारी बँकांचा प्रोव्हिजनिंग कव्हरेज रेशो ९७.८% इतका भरभक्कम आहे. यापैकी शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा हा रेशो ९०% आहे तर नॉन शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा हा रेशो १०२.४% इतका आहे. थकीत कर्जाच्या तरतुदी संदर्भातला हा रेशो समाधानकारक आहे.

**प्रगतीची काही चिन्हे**

नागरी सहकारी बँकांच्या कामगिरीची नेहमी तुलना व्यापारी बँकांसोबत करण्यात येते. यावर्षीच्या रिपोर्टमध्ये पर्याप्त भांडवलाच्या बाबतीत नागरी सहकारी बँका व्यापारी बँकांच्या बरोबर आहेत. दोन्हींचा आकडा १७.७% इतका आहे.

त्याचप्रमाणे नेट इंटरेस्ट मार्जिनचा आकडाही दोन्ही बँकांच्या बाबतीत सारखा म्हणजेच ३.३% इतका आहे.

प्रोव्हिजन कव्हरेज रेशो मध्ये नागरी सहकारी बँका, व्यापारी बँकांपेक्षा पुढे आहेत. व्यापारी बँकांसाठी हा रेशो ७५.६% इतका आहे तर नागरी सहकारी बँकांचा हा रेशो ९७.८% इतका आहे.

**ग्रॉस आणि नेट एनपीएची काळजी**

आपल्या थकीत कर्जांच्या बाबतीत नागरी सहकारी बँकांना यापुढे अधिक काळजी घेणे आवश्यक राहील. व्यापारी बँकांच्या थकीत कर्जाचा आकडा, ग्रॉस आणि नेट अनुक्रमे १%, आणि ०.४% असा आहे, तर नागरी सहकारी बँकांसाठी हेच आकडे ५.२% आणि १.८% असे आहेत. ही बाब खरोखरच काळजीची आहे. व्यापारी बँका आपली कर्ज ज्या सहजपणे निर्लेखित करू शकतात, त्या प्रमाणात नागरी सहकारी बँकांना ते शक्य नसते. तथापि वसुलीवर योग्य तो भर देऊन, कर्ज देताना पुरेशी काळजी घेऊन थकीत कर्जाचा आकडा आटोक्यात ठेवणे नागरी सहकारी बँकांना शक्य आहे. याबाबतीत कर्ज व्यवहार आणि वसुलीकडे लक्ष दिल्यास निश्चितपणे प्रगती होऊ शकेल असा विश्वास आहे. रिझर्व बँकेने दिलेल्या प्रगती पुस्तका प्रमाणे नागरी सहकारी बँकांना सुधारण्यासाठी अजून प्रयत्न करावे लागतील. बँकिंग मधील स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी ते आवश्यक राहील.

**– अभय मंडलिक**

बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को ऑपरेटीव्ह बँकेचे संचालक आहेत

# कारगिल विजय दिवसानिमित्त वीरसैनिक व वीरपत्नींचा कृतज्ञता सन्मान सोहळा

मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी) – सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्यावतीने कारगिल विजय दिवसानिमित्त कारगिल युद्धातील महाराष्ट्रातील वीरसैनिक, वीरपत्नी, वीरमाता तसेच दिव्यांग सैनिक यांच्या राष्ट्रसेवेतील अद्वितीय शौर्य, त्याग आणि अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'वीरसैनिक व वीरसैनिकांच्या वीरपत्नींचा कृतज्ञता सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा सोमवार, २७ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता लोकभवन, मुंबई येथे होणार आहे. कारगिल युद्धातील वीर योद्धे, वीरनारी, वीरमाता तसेच दिव्यांग सैनिक यांच्या राष्ट्रसेवेतील अद्वितीय शौर्य, पराक्रम, त्याग आणि योगदानाला कृतज्ञ अभिवादन करण्याच्या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे आणि अखंडतेचे रक्षण करताना भारतीय सशस्त्र दलातील वीर जवानांनी केलेल्या सर्वोच्च त्यागाची स्मृती जागविणे आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री अॅड. आशिष शेलार तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवर सन १९६२ मध्ये महान गीतकार कविवर्य प्रदीप यांनी रचलेली आणि संगीतकार सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेली वीरनारी व वीरमातांना समर्पित ऐतिहासिक देशभक्तिपर रचना, स्वराधीश डॉ. भरत बलवल्ली यांनी नव्याने स्वरबद्ध केली आहे. या रचनेतून राष्ट्रभक्ती, शौर्य आणि त्यागाच्या भावनेला उजाळा देण्यात येणार आहे. भारतीय सशस्त्र दलाच्या अदम्य शौर्य, पराक्रम, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेला अभिवादन करणारी देशभक्तिपर सांगीतिक प्रस्तुतीही या कार्यक्रमात सादर करण्यात येणार आहे. नचिकेत देसाई, शिवम सिंह आणि इतर ख्यातनाम कलाकारांच्या सादरीकरणातून भारतीय सैनिकांच्या शौर्यगाथेला सांगीतिक अभिवादन करण्यात येणार आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी दिली.

# स्वराज्याची ज्योत पेटविणारे : लोकमान्य टिळक

**भारत** मातेच्या प्रखर मातृप्रेमापोटी जीवाची पर्वा न करता इंग्रजांशी खंबीरपणे लढून भारतमातेच्या मुक्ततेसाठी संघर्ष करणाऱ्यात महान कर्मयोगी, तत्त्व -वेत्ता, ऋषीतुल्य व्यतिमत्व म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक होत. यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली गावात एका चितपावन ब्राम्हण कुटुंबात झाला. लहान पणा पासून च अत्यंत कुशाग्र बुद्धिमान असलेल्या बाळ गंगाधर टिळकांना मातृछत्र व पितृछत्र चा लाभ फारसा मिळाला नाही. टिळकांचे मन लहानपणीच अनाथ झाले होते, मात्र जिद्दीच्या जोरावर व कुशाग्र बुद्धीमत्तेच्या सहाय्याने त्यांनी आपले अध्ययन पूर्ण केले. त्यांचे आवडते विषय गणित आणि संस्कृत होते.



विखुरलेल्या भारतीयांना एकत्र आणून त्यांच्यातील स्वाभिमानाचे स्फुल्लिंग प्रज्वलित व्हावे या उद्धेशाने त्यांनी महाराष्ट्रत गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव सुरू केले. यात प्रामुख्याने देशाभिमान व देशभक्ती जागृतीचे भाषणे व प्रसंग देखावे असायचे.त्यांनी ठिकठिकाणी व्यायाम शाळा सुरू करून यातून बालसंपन्नता व राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न होते.१८६६साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ होता,तरी तत्कालीन इंग्रज सरकारची जोर -जबरदस्तीने कर वसुली सुरू होती याविरुद्ध त्यांनी वस्तुनिष्ठ बातम्या मराठा आणि केसरी वृत्तपत्रातून याला वाचा फोडली.

१८६७ साली आलेल्या प्लेग साथीच्या काळात कमिशनर रँड च्या अमानुष अत्याचाराला केसरी वृत्त पत्रातून वाचा फोडली व त्याच्या अमानुषतेला कडाडून विरोध केला.१९००, साली काँग्रेस अधिवेशनात दिल्ली ला ते उपस्थित होते. त्यानंतर ते नागपूरला आले त्यांना या ठिकाणी'लोकमान्य' ही पदवी बहाल करण्यात आली.

परदेशी वस्तूंचा बहिष्कार, स्वदेशी वस्तू वापर, वंगभंग आंदोलनाचे नेतृत्व टिळकांनी केले होते.'स्वराज्य माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळणारच 'या त्यांच्या घोषणेने देशवासीयांना झपाटून टाकले होते. २४ जून, १९०८ मध्ये सरकार विरोधी लेखन केल्यामुळे त्यांच्यावर इंग्रज सरकारने राजद्रोह खटला भरला यात त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. ही शिक्षा भोगत असताना त्यांनी'गीतारहस्य'लिहिले.

१६ जून,१९१४मध्ये त्यांची सुटका झाली,दोनच वर्षात बेळगाव मध्ये त्यांनी 'होमरूळ'ची स्थापना केली.

अशा या महान नेत्याने १९२० पर्यंत देश स्वातंत्र्यसाठी अखंड संघर्ष केला. या महान स्वातंत्र्य सेनानीच्या स्मृतींना कोटी!कोटी!! प्रणाम.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

### महिमा टिळकांची

लोकमान्य टिळकांची
जगी महिमा महान
टिळकांचे गुण गाती
थोर आणि लहान
टिळकांचे कार्य
स्वराज्याची सेवा
जन्मसिद्ध हक्क
स्वातंत्र्याचा ठेवा
भारत आमची भूमी
भारत आमची माता
भारत माते पुढे
टेकवू सारे माथा
परकीयांनो देशातून
काढा तुम्ही पाय
टिळकांची गर्जना
भारत भूमी माय
टिळक आमचा प्राण
टिळक आमचा मान
देश आमचा भारत
जगी असे महान
टिळकांच्या सेवेला
नतमस्तक होऊ या
देशाचे स्वातंत्र्य
आपण टिकवू या...

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर



पुणे दि. २२ ( प्रतिनिधी ) – महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त नाना काटे सोशल फाउंडेशनच्या वतीने पुण्यातील पिंपळे सौदागर येथे दि. २२, २६ आणि २७ जुलै या दरम्यान तीन दिवसीय रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मा. विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल नाना काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दि. २२ रोजी सकाळी महादेव मंदिर येथे झालेल्या या शिबिरात सुरुवातीला अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन दिपप्रज्वलन करण्यात आले.

याप्रसंगी युवानेते उमेश काटे, नंदुआप्पा काटे, सागर कोकणे, सतिश डोंगरे, निलेश जगताप, संदिप जगताप, सचिन देसाई, संदेश घाटे, काळुराम कवतिके , ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाष पवार, श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचे अध्यक्ष विलास जोशी आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शशि काटे यांनी केले. जनसेवा ब्लड सेंटरच्या वतीने या शिबिरात तीन दिवस रक्तसंकलन करण्यात येणार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# काँग्रेसच्या आंदोलनाविरोधात भाजपचे गांधी भवनासमोर जोरदार निदर्शने




छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- भारतीय जनता पार्टी, छत्रपती संभाजीनगर महानगरच्या वतीने आज शहागंज येथील गांधी भवन परिसरात काँग्रेस पक्षाने पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर केलेल्या आंदोलनाच्या निषेधार्थ जोरदार निदर्शने केली. या वेळी काँग्रेसच्या भूमिकेचा निषेध करत केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीला पाठिंबा व्यक्त करण्यात आला.

या निषेध आंदोलनात कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, माजी आमदार संजय केणेकर, भाजपचे शहराध्यक्ष किशोर शितोळे, महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी भाजपचे नगरसेवक, नगरसेविका, विविध मोर्चा व आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी काँग्रेसच्या आंदोलनावर टीका करत अशा प्रकारची आंदोलने लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारी असल्याचे सांगितले. तसेच केंद्र सरकारच्या जनहिताच्या निर्णयांना पाठिंबा देत भाजप कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.

दरम्यान, राजधानी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाबाहेर लोकसभेचे विरोधी पक्षनेते व काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात देशभरातील खासदार तसेच अनेक राज्यांचे मुख्यमंत्र्यांनी आंदोलन केले. यावेळी पोलिसांनी बाळाचा वापर करत राहुल गांधी यांच्यासह प्रियंका गांधी यांना देखील अटक केली होती. यावेळी राहुल गांधी यांना थेट उचलून गाडीत बसवल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे देशभरात अनेक ठिकाणी काँग्रेसकडून आंदोलन करण्यात येत आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून आता भाजपनेही आंदोलन करण्यास सुरुवात केली आहे.

# सावित्रीबाई फुले भाजीमंडई संकुलाचे लोकार्पण

## स्वच्छ भाजी मंडई ठेवण्याचे सर्वांचे कर्तव्य-मंत्री अतुल सावे



छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विद्यमाने बीओटी तत्त्वावर विकसित करण्यात आलेल्या या'सावित्रीबाई फुले भाजीमंडई संकुल, संभाजीपेठ' या आधुनिक प्रकल्पाचे आज राज्याचे मंत्री अतुल सावे यांच्या शुभहस्ते लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर समीर राजूरकर होते.

विधानसभेचे सदस्य प्रदीप जैस्वाल, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्ष नेता समीर साजिद, सभागृह नेते गोविंद केंद्रे, गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती सभापती जालिंदर शेंडगे, नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल, सचिन खैरे, शिवाजी दांडगे, राजगौरव वानखेडे, नगरसेविका कीर्ती शिंदे, अमृता पालोदकर, तरन्नुम अखिल अहमद, नूर जहान इकबाल,आयुक्त अमोल येडगे,अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, उप आयुक्त अपर्णा थेटे, उप अभियंता संजय चामले पात्र लाभार्थी ,नागरिक तसेच यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.व दीप प्रज्वलन करण्यात येऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. लोकार्पणानंतर मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात एकूण सहा ओटे धारक भाजी विक्रेत्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रकल्पामुळे व्यापाऱ्यांना सुरक्षित, सुसज्ज व व्यवस्थित व्यवसायाचे वातावरण उपलब्ध होणार असून नागरिकांनाही अधिक दर्जेदार सुविधा मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना मंत्री अतुल सावे म्हणाले की, 'छत्रपती संभाजी नगरच्या विकासात अशा आधुनिक सुविधा महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील. व्यापाऱ्यांना दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि नागरिकांना स्वच्छ व नियोजनबद्ध बाजारपेठ देणे ही शासनाची प्राथमिकता आहे. तसेच ही भाजी मंडई स्वच्छ ठेवण्याचे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.महानगरपालिकेच्या इतर ठिकाणी खुल्या जागा असतील त्या ठिकाणी सुद्धा भाजी मंडई विकसित करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.तसेच त्यांनी सभापती अनिल मकरिये यांचे विशेष कौतुक केले. त्यांच्या विशेष पुढाकारातून ही भाजी मंडई पुन्हा १४ वर्षानंतर नव्या रूपात सुरू होत आहे. असे ते म्हणाले.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना महापौर समीर राजूरकर म्हणाले की, 'महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरात आधुनिक सुविधा निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. ही भाजी मंडई व्यापारी आणि ग्राहक या दोघांसाठीही आदर्श बाजारपेठ ठरेल.'तसेच भाजी मंडई बाहेर या पुढे कोणतेही अतिक्रमण खपवून घेतले जाणार नाही याची मनपा प्रशासनाने दक्षता घ्यावी असे ते म्हणाले.

उपमहापौर राजेंद्र जंजाळ म्हणाले की, 'महानगरपालिकेने नागरिकांच्या सोयीला प्राधान्य देत हा प्रकल्प पूर्ण केला आहे. भविष्यातही अशाच लोकाभिमुख विकासकामांना गती दिली जाईल.' तसेच यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की,१४ वर्षानंतर ही भाजी मंडई सुरू होत आहे.आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या दिवशी सावित्रीबाई फुले भाजी मंडई याचे लोकार्पण होत आहे.या सारखा सुवर्ण दिवस नाही.मां. महापौर,उप महापौर,आयुक्त यांचे मी विशेष आभार मानतो. त्यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.मी यासाठी वेळोवेळी आढावा घेतला.बैठका घेतल्या.भाजी विक्रेत्यांची समजूत काढली.यामुळे ही भाजी मंडई पुन्हा नव्या रूपात सुरू होत आहे.या मूळ भाजी विक्रेत्यांना हक्काचे ओटे व गाळे मिळणार आहे.

आपले प्रास्ताविक करताना आयुक्त अमोल येडगे म्हणाले की, 'सावित्रीबाई फुले भाजीमंडई संकुल हे आधुनिक नियोजन, सुविधा आणि व्यवस्थापन यांचा उत्कृष्ट संगम आहे. नागरिक व व्यापाऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका सातत्याने प्रयत्नशील राहील.'

यावेळी भाजी विक्रेते यांच्या वतीने शशिकला खोबरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमांचे सूत्र संचालन प्रशासन अधिकारी संजीव सोनार यांनी केले.

# हरित महाराष्ट्र आयोग व छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण सप्ताहास उत्साहात प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- हरित महाराष्ट्र आयोग व छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै ते २९ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित वृक्षारोपण सप्ताह कार्यक्रमास उत्साहात प्रारंभ करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत प्रभाग क्रमांक २७ मध्ये एनआरबी सोसायटी येथे १००, कालिका माता मंदिर परिसरात २५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे १५ आणि ई-सेक्टर उद्यान येथे २० अशी एकूण १६० वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच प्रभाग क्रमांक ११ अंतर्गत १५० वृक्षांची लागवड करण्यात आली. अशा प्रकारे दोन्ही प्रभागांमध्ये मिळून एकूण ३१० वृक्षांची लागवड करून वृक्षारोपण सप्ताहाची सुरुवात करण्यात आली.

याच निमित्ताने प्रभाग क्रमांक २७ मध्ये वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागरिकांमध्ये वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमास इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, महापौर समीर राजुरकर, प्रभाग क्रमांक २७ चे नगरसेवक रेणुकादास (राजू) वैद्य, प्रभागातील सर्व सदस्य, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, मुख्य उद्यान अधिकारी विजय पाटील, तसेच उद्यान विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते विविध ठिकाणी ३१० वृक्षरोपांची प्रत्यक्ष लागवड करण्यात आली. यावेळी




पर्यावरण संरक्षण, हरित शहर निर्मिती आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने वृक्षसंवर्धनाची सामूहिक शपथ घेण्यात आली. या वृक्षारोपण सप्ताहात शहरातील विविध भागांत मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला असून नागरिकांनीही या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षणः जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या मुलाखतीचे आज आकाशवाणीवरुन प्रसारण

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात सुरु असलल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (एस.आय.आर.) बाबत सविस्तर माहिती देणारी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांची मुलाखत गुरुवार दि.२३ रोजी सकाळी ८ वा. ४० मि. नी प्रसारीत होणार आहे. आकाशवाणीच्या एफ. एम. १०१.७ वाहिनीवरुन हे प्रसारण श्रोत्यांना ऐकता येणार आहे. जिल्ह्यात सुरु असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती या मुलाखतीतून जिल्हाधिकारी गौडा यांनी दिली आहे. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी जिल्हाधिकारी गौडा यांच्याशी बातचीत केली आहे. आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरचे कार्यक्रम अधिकारी सुजीत बनसोडे हे या कार्यक्रमाचे सादरकर्ते आहेत. ही मुलाखत अत्यंत उद्बोधक व माहितीपुर्ण असून मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रिया जाणून घेण्यासाठी अवश्य ऐकावी. श्रोत्यांना एफ.एम. १०१.७ Mhz या वाहिनीवर ही मुलाखत ऐकता येईल आणि News on AIR ॲप वर ही मुलाखत देशभरात कोठेही ऐकता येणार आहे. ही मुलाखत मतदारांनी अवश्य ऐकावी असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सविता चौधर यांनी केले आहे.



# नूतनीकरण आधार सेवा केंद्राचे लोकार्पण

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिक प्रशासकीय इमारत टप्पा क्र.०३ येथे आधार सेवा केंद्र सुरू करण्यात आली आहे. या केंद्राचे नूतनीकरण करण्यात आले असून या नूतनीकरण आधार सेवा केंद्राचे लोकार्पण आज करण्यात आले.




महापौर समीर राजुरकर यांच्या हस्ते या केंद्राचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी उप महापौर राजेंद्र जंजाळ,विरोधी पक्ष नेते समीर साजिद,आयुक्त अमोल येडगे,शहर अभियंता संजय कोंबडे,उप आयुक्त अंकुश पांढरे ,विकास नवाळे,वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ उज्वला भामरे,उद्यान अधिक्षक डॉ.विजय पाटील,उप संचालक नगर रचना मनोज गर्जे,आदींची उपस्थिती होती. यावेळी सर्व मान्यवरांनी आधार सेवा केंद्राचे पाहणी केली व सविस्तर माहिती घेतली.

# 'प्रोजेक्ट आरोग्य मम्मे'चा शुभारंभ; २० आशा सेविकांची मोफत मॅमोग्राफी तपासणी

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- कमलनयन बजाज हॉस्पिटल आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या आरोग्य संरक्षणासाठी 'प्रोजेक्ट आरोग्य मम्मे' या उपक्रमाचा बुधवारी शुभारंभ करण्यात आला. महानगरपालिकेतील महिला आशा सेविका तसेच वर्ग ३ व ४ मधील महिला कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या या अभियानांतर्गत पहिल्या टप्प्यात २० आशा सेविकांची मोफत मॅमोग्राफी तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमास उपमहापौर राजेंद्र जंजाळ, आरोग्य सभापती डॉ. सुनिता सोळुंके, नगरसेविका अनिता घोडेले, माजी महापौर नंदकुमार घोडेले, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्ज्वला भामरे, डॉ. अजय रोटे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते अत्याधुनिक मॅमोग्राफी मशीनचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे रोप देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांनी कमलनयन बजाज हॉस्पिटल व वैद्यकीय तज्ज्ञांचे या उपक्रमाबद्दल आभार मानले. महानगरपालिकेतील आशा सेविका आणि वर्ग ३ व ४ मधील महिला कर्मचाऱ्यांसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त व जीवनदायी ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. कोणत्याही आजाराचे वेळेत निदान झाल्यास त्यावर कमी खर्चात आणि प्रभावी उपचार शक्य होतात, तर उशिरा निदान झाल्यास उपचाराचा खर्च वाढतो आणि बरे होण्यासाठी अधिक वेळ लागतो, असे त्यांनी नमूद केले.

महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक करत महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी कमलनयन बजाज हॉस्पिटलचे योगदान मोलाचे असल्याचे सांगितले. महानगरपालिका आणि आरोग्य संस्थांच्या समन्वयातून अशा उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. अजय रोटे यांनी सांगितले की, कमलनयन बजाज हॉस्पिटल समाजहिताचे व लोककल्याणकारी उपक्रम सातत्याने राबवत असून, या अभियानामुळे अनेक महिलांना स्तनाच्या कर्करोगाचे वेळेत निदान आणि उपचाराची संधी उपलब्ध होणार आहे.



कमलनयन बजाज हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस यांनी सांगितले की, महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असून वेळेत निदान झाल्यास हा आजार पूर्णपणे उपचारयोग्य आहे. समाजातील प्रत्येक महिलेला दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा मिळावी या उद्देशाने 'प्रोजेक्ट आरोग्य मम्मे' सुरू करण्यात आला आहे. हा केवळ एक दिवसाचा उपक्रम नसून भविष्यातही सातत्याने राबविण्यात येणार आहे. महानगरपालिका, सामाजिक संस्था आणि विविध घटकांच्या सहकार्याने अधिकाधिक महिलांपर्यंत मोफत मॅमोग्राफी तपासणी पोहोचविण्याचा संकल्प असून महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करून स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

## (पान १ वरुन)

### नीट पेपरफुटीवरून काँग्रेस...

केले. आंदोलकांनी बॅरिकेड्स ओलांडण्याचा प्रयत्न केल्यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करत त्यांची धरपकड सुरू केली. अनेक आंदोलकांना पोलिसांच्या वाहनातून घटनास्थळावरून हटविण्यात आले. आंदोलनादरम्यान केंद्र सरकारविरोधात आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. पंतप्रधान मोदींचा राजीनामा होत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील, अशी भूमिका आंदोलकांनी घेतली. संसदेत विरोधकांनी काळे कपडे परिधान करून केलेल्या निषेधाचाही उल्लेख करत सरकार विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप काँग्रेसने केला.

पुण्यात युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या मुख्य कार्यालयाबाहेर भरपावसात ठिय्या आंदोलन केले. मोठ्या संख्येने जमलेल्या कार्यकर्त्यांनी 'नीट घोटाळ्याची चौकशी करा', 'विद्यार्थ्यांना न्याय द्या', 'धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा' अशा घोषणा देत केंद्र सरकारचा निषेध केला. मुसळधार पावसाची पर्वा न करता आंदोलन सुरूच ठेवल्याने कार्यालय परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. मात्र आंदोलन सुरूच राहिल्याने प्रमुख कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले.

### शरद पवारांनी काल जंतरमंतरवर...

पेपरफुटीच्या मुद्द्यावरुन दिल्लीच्या जंतर मंतर येथे सुरु असलेले आंदोलन आणि दिल्ली पोलिसांकडून आंदोलकांना बेछूटपणे करण्यात आलेला लाठीमार यामुळे सध्या केंद्र सरकारविरोधात कधी नव्हे इतके नकारात्मक वातावरण निर्माण झाले असून सरकार मोठ्या कोंडीत सापडले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर शरद पवार आणि नरेंद्र मोदी यांनी भेट ही अनेक अर्थांनी महत्त्वाची मानली जात आहे. शरद पवार हे जंतर मंतरवरील आंदोलक आणि केंद्र सरकार यांच्यातील दुवा ठरणार का, अशी चर्चा सुरु झाली आहे. याबाबत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

मला शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांच्या भेटीबद्दल नेमकी काही माहिती नाही. पण पवार साहेबांचा जो काही अनुभव आहे, काल ते विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा द्यायला जंतरमंतरवर गेले होते. अभिजीत दिपकेंना भेटले आणि पाठिंबा दिला. पवार साहेब आणि सुप्रिया सुळे पंतप्रधानांसोबत याबाबत चर्चा करायला आणि मार्ग काढावा म्हणून गेले असतील, त्यासंदर्भात बैठक असेल. त्यापलीकडे काही राजकीय चर्चा झाली असेल, असे मला वाटत नाही. शरद पवार काल विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला भेट द्यायला गेले, त्यांनी हे आंदोलन दडपू नये, असे वक्तव्यही केले होते. त्यामुळे आता याबाबत मार्ग निघावा म्हणून ते मोदींना भेटले असतील, असे शशिकांत शिंदे यांनी म्हटले. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आजच्या भेटीवेळी पंतप्रधान मोदींना एक पत्र दिले. महाराष्ट्र कृषी आणि जलक्षेत्र संबंधित शेतकऱ्यांच्या गंभीर स्थितीबद्दलचे हे पत्र असल्याचे समजते. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत, चौकशीतील विलंब टाळणे आणि मानसिक आरोग्य सहाय्य उपलब्ध करून देण्याची मागणी या पत्रातून करण्यात आली आहे.

### कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरुन तीव्र...

केली जात असेल, तर आपण गप्प बसू शकत नाही. एक सुजान नागरिक आणि लोकप्रतिनिधी म्हणून या अन्यायग्रस्त विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे आपले कर्तव्य आणि नैतिक जबाबदारी आहे. भावी पिढीच्या भविष्याशी खेळणाऱ्या या निर्दयी व्यवस्थेला जाब विचारावाच लागेल असे शिंदे म्हणाले.

मी सर्व खासदार, आमदार, प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, फ्रंटल सेल अध्यक्ष आणि कार्यकर्त्यांना आवाहन करतो की, या दडपशाही करणाऱ्या सरकारच्या निषेधार्थ आणि तरुण पिढीच्या न्यायासाठी आपण स्थानिक स्तरावर तीव्र आंदोलने उभी करुया. संविधानाची पायमल्ली करणाऱ्या, विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलणाऱ्या या सरकारचा आणि बळाचा गैरवापर करणाऱ्या प्रशासकीय दंडेलशाहीचा आंदोलनाच्या माध्यमातून जोरदार निषेध करुयात असे शशिकांत शिंदे म्हणाले.

# वेरूळमध्ये 'सीतेचा नहाना' धबधबा ओसंडून वाहिला

वेरूळ दि.२२ (प्रतिनिधी)- जगप्रसिद्ध वेरूळ लेणी येथील लेणी क्रमांक २९ वरील धबधबा या पावसात दुसऱ्यांदा पूर्ण क्षमतेने वाहू लागला आहे. 'सीतेचा नहाना' म्हणून ओळखला जाणारा हा धबधबा आणि त्यावरील सात कुंड पाण्याने तुडुंब भरल्याने लेणी परिसराचे मनमोहक दृश्य पाहण्यासाठी पर्यटकांनी मोठी गर्दी केली आहे.

वरच्या बाजूला असलेल्या जोगेश्वरी लेणी परिसरातील सातही कुंड पावसाच्या पाण्याने भरून वाहू लागले आहेत. त्यातील साचले पाणी थेट कड्यावरून कोसळत असल्याने धबधब्याला अधिकच वेग आला आहे. हिरवाईने नटले डोंगर, धुक्याने वेढले वातावरण आणि धबधब्याचा गजर यामुळे वेरूळ लेणींचे सौंदर्य अधिकच खुलले आहे.

धबधब्याचे हे रौद्र आणि शांत रूप एकत्रित पाहण्यासाठी देश-विदेशातील पर्यटकांची गर्दी वाढली आहे. अनेक पर्यटक कैलास मंदिरासोबतच या धबधब्याचे फोटो आणि व्हिडिओ काढण्यात मग्न आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान; दि.२६ जुलै ते २ ऑगस्ट पर्यंत जिल्ह्यात आयोजन




छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात विधानसभा क्षेत्रनिहाय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात या अभियानाची तयारी सुरु करण्यात आली असून रविवार दि.२६ जुलै ते रविवार दि.२ ऑगस्ट या कालावधीत हे अभियान राबविले जाणार आहे.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज या अभियानाच्या पूर्वतयारी संदर्भात आढावा घेतला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., अपर मुख्य कार्यकारी अधिकारी सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड, जिल्हा उपनिबंधक समृत जाधव, महिला बालविकास प्रकल्प अधिकारी मंगला पांचाळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी तसेच सर्व विभागप्रमुख आदी उपस्थित होते. तर दुरदृष्य प्रणालीने तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

अभियानाबाबत माहिती देण्यात आली की, राज्यभरात हे अभियान राबविण्यात येणार असून जिल्ह्यात रविवार दि.२६ जुलै ते रविवार दि.२ ऑगस्ट या कालावधीत राबविले जाणार आहेत. यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी वेळापत्रकाची माहिती दिली. त्यानुसार, पैठण येथे रविवार दि.२६ रोजी भुमरे लॉन, पाचोड, गुरुवार दि.३० रोजी तहसिल कार्यालय फुलंब्री येथे, शिवूर ता. वैजापूर येथे , स्वस्तिक मंगल कार्यालय सिल्लोड येथे, दि.३१ रोजी एमआयटी कॉलेज छत्रपती संभाजीनगर येथे, हतनुर ता. कन्नड येथे, दि.२ ऑगस्ट रोजी भक्त निवास भद्रा मारोती संस्थान खुलताबाद येथे, आंबेलोहोळ ता. गंगापूर येथे हे अभियान राबविले जाणार आहेत. जिल्हास्तरीय कार्यक्रम एमआयटी महाविद्यालयाच्या स्पंदन सभागृहात दि.३१ रोजी होणार आहे.

या अभियानास सर्व लोकप्रतिनिधी आदींना आमंत्रित करुन लोकहिताच्या योजनांचे स्टॉल्स अभियान स्थळी लावण्यात येणार आहे. अभियानाची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवून लोकांना लाभ देण्याबाबत उपाययोजना व व्यवस्था करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.